महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा क्रः तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२२-२३/२०२२/ 4148 दिनांक : ०१.०९.२०२२

01 SEP 2022

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील महाराष्ट्र शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी महाडीबीटी पोर्टलवर संस्थांची माहिती (Institute Profile) अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र जा.क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/२२७ दिनांक २४.०८.२०२२.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून महाराष्ट्र शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी बनविण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टलद्वारे (संकेतस्थळ - www.mahadbtmahait.gov.in) संकेतस्थळ तंत्रशिक्षण संचालनालयाकडून खालील योजना राबविण्यात येतात.

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना.
२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाहभत्ता योजना.
३. उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना.

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता,** महाडीबीटी पोर्टलवर नोंदणीकृत असणा-या (Registered Institute) संस्थांना, संस्थांची माहिती (Institute Profile) अद्ययावत करण्याकरीता डीबीटी पोर्टल **दिनांक १८.०८.२०२२ पासून** सुरु करण्यात आलेले आहे.

१. संस्थांनी, डीबीटी पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन संस्था माहिती (Institute Profile) अंतर्गत असलेली सर्व माहिती जसे शैक्षणिक शुल्क, अभ्यासक्रम तपशील इत्यादी (For example: Fee details, Course Details etc.) अचूक भरुन पुढील कार्यवाहीसाठी पाठवावी. (संस्थेकडून भरण्यात आलेल्या माहितीची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख यांची राहील याची संस्थांनी नोंद घ्यावी.)
२. संस्थांनी, सदर माहिती सक्षम प्राधिकरणाकडून मंजूर करुन घ्यावी, जेणेकरुन डीबीटी पोर्टलवर संस्थांना त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त झालेले, विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता येतील. [तसेच, शैक्षणिक शुल्क मंजूरी प्रलंबित (Fees Not Approved) या कारणास्तव जर संस्थांना विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविता आले नाही तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख यांची राहील याची नोंद घ्यावी.]
३. डीबीटी पोर्टलवर संस्थेकडून भरण्यात आलेले व मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले वर्षनिहाय शुल्क डीबीटी पोर्टलवर एकदा मंजूर करण्यात आले तर ते दुरुस्त करता येणार नाही व मंजूर झालेल्या शुल्कानुसार त्या त्या संबंधित योजनांचा लागू असलेला लाभ देण्यात येतो या कारणास्तव डीबीटी पोर्टलवर संस्थांनी घटकनिहाय शुल्क अचूक भरुन मंजूरीसाठी पाठवावे याची संस्थांनी नोंद घ्यावी.

वर ऑनलाईन अर्ज (नविन/नुतनीकरण) सादर करण्याची प्रक्रीया लवकरच सुरु होणार आहे. त्याअनुषंगाने सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयामधील एकही पात्र विद्यार्थी राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजनांपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

खाजगी विनाअनुदानित अभ्यासक्रमाच्या संस्थांनी त्यांचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीताचे शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर झालेले शिक्षण शुल्क व विकास शुल्क (शुल्क नियामक प्राधिकरणाचे मान्यतेचे पत्रासह) तसेच सर्व संस्थांनी संलग्न असलेल्या विद्यापीठ/मंडळ यांचे मान्य परीक्षा शुल्क या विभागीय कार्यालयाकडे ऑनलाईन पद्धतीने मान्यतेकरीता पाठवायचे आहे. स्वायत्त संस्थांनी त्यांचे बोर्ड ऑफ गव्हर्नन्सच्या बैठकीतील ठरावासह मंजूर केलेले परीक्षा शुल्काची प्रत संबंधीत प्राचार्य/संचालक यांनी साक्षांकीत करून या विभागीय कार्यालयास हस्तदेय सादर करुन मान्य करुन घ्यावे.

सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, शुल्क अद्ययावत करण्याची ऑनलाईन प्रक्रीया प्राधान्याने करावी.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

२/२